# परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना

शासन निर्णय वित्त विभाग क्रं. अंनियो १००५/१२६/सेवा४ दि. ३१/१०/२००५ अन्वये शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्ती होणा-या कर्मचा-यांसाठी सध्या आस्थित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आलेली आहे.

सदर आदेश अध्या अस्थित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू आहे अशा मान्यता प्राप्त व अनुदान पात्र शैक्षणिक संस्था कृषित्तर विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषी विद्यापीठे इत्यादींच्या सेवेमध्ये दि. १.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त कर्मचा-यांनाही लागू आहे.

१. राज्यातील खाजगी अनुदानीत माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक विद्यालये व सैनिक शाळा यामध्ये सुधारीत शिक्षण सेवक योजना सुरु करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २६.४.२००६ विचारात घेवून प्रसताव सादर करावेत.
२. उच्च माध्यमिक स्तरावर शिकविणा-या अहर्ताधारक शिक्षकांच्या कार्यभारात शासन निर्णय दिनांक १.१२.२००५ मधील तरतुदी नुसार सादर करावेत.

शैक्षणिक वर्ष २००४-०५ पासून पटपडताळणी व कार्यभार निश्चितीचे वेळेसच तक्ता अ मधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांच्या मान्यता तसेच विशेष वेतनावर नियुक्त शिक्षक कर्मचा-यांना मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

याबाबतीत आपण आपल्या कनिष्ठ महाविंद्यालयातील शैक्षणिक वर्ष २००९- २०१० मध्ये तक्ता अ मध्ये नमुद केलेल्या व शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ मध्येही कार्यभारात कार्यभारात बदल होत नसलेमुळे मान्य होणा-या सर्व कर्मचा-यांच्या नावाच्या दोन छापील प्रती शिक्षक मान्यता कृतीसत्रात

सादर कराव्यात व त्यामध्ये शेवटी प्राचार्यांना तक्ता अ मधील अ.क्रं. १ ते शेवट पर्यंतच्या कर्मचा-यांच्या नोंद बाबतची आवश्यक असलेली प्रमाणपत्रे पाहून तपासणी मी स्वतः केली असून सदर नोंदी बरोबर आहेत त्यात तफावत आढळल्यास त्यास वैयक्तिक मी स्वतः जबाबदार राहील या आशयाचे प्रमाणपत्र नोंदवून मुख्याध्यापकांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

वरील मागदर्शक सूचनांचा अभ्यास करुन पदभार व कार्यभार निश्चिती, शिक्षक मान्यता करणे बाबत परिपूर्ण माहिती सादर सादर करुन वेळीच मान्यता घेण्यात याव्यात. याबाबत कार्यालयाशी कोणताही पत्र व्यवहार करु नये.

प्रस्तावाच्या मुख्य पत्रात प्रस्तावाचा सारांश क्रमाने येणे आवश्यक आहे. शिक्षक मान्यता नस्तीस पृष्ठ क्रं. देऊन त्याची अनुक्रमाणिका असणे आवश्यक आहे.